Corporate Communications & Investor Relations

Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5

TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 495

## वृत्तपत्रीय निवेदन

दिनांक २५ मार्च २०२१

### बँक ऑफ महाराष्ट्रचा अंदमान व निकोबार बेटांवर ठसा : पश्चिम बंगाल मध्ये ५ नवीन शाखा सुरु केल्या

**पुणे दिनांक २५ मार्च २०२१.** : सार्वजनिक क्षेत्रातील एक अग्रगण्य बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रचे मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक श्री ए एस राजीव यंनी दुरदृश्य पद्धतीने बँकेच्या नवीन सहा शाखांचे उद्घाटन केले. बँकेचे कार्यकारी संचालक श्री हेमंत टम्टा हे दुरदृश्य प्रणाली द्वारे व दुसरे कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार तसेच सरव्यवस्थापक श्री व्ही डी कोल्हटकर व श्री यु आर राव हे बँकेच्या मुख्य कार्यालयातून या समारंभात सहभागी झाले होते. कोलकाता विभागातील सदर सहा शाखांपैकी एक शाखा अंदमान निकोबार बेटांची राजधानी पोर्ट ब्लेयर येथे असून उर्वरित पाच शाखा या पश्चिम बंगाल मधील जलपायगुडी, कूच बिहार, रायगंज, झारग्राम, व कृष्णनगर येथे सुरु करण्यात आल्या आहेत. या शाखा सुरु झाल्यानंतर बँक ऑफ महाराष्ट्रच्या संपूर्ण देशात १९४९ बँकिंग व्यवसाय शाखा झाल्या आहेत. .

य शाखा सुरु होण्यामुळे आम्हाला अतिशय आनंद झाला असून देशाच्या प्रत्येक जिल्ह्यात बँकेची किमान एक शाखा असण्याच्या व त्या द्वारे संपूर्ण देशात बँकेचा ठसा असण्याच्या आमच्या ध्येयाकडे आमची वेगाने वाटचाल सुरु असल्याचे बँक ऑफ महाराष्ट्रचे मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक श्री ए एस राजीव यांनी या प्रसंगी सांगितले. सदर सहा शाखा सुरु केल्याबद्दल बँकेच्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करतानाच व्यवसायाच्या या नवीन ठिकाणी जनतेची सेवा करण्याची संधी बँकेला मिळत असल्याबद्दल बँक ऑफ महाराष्ट्रचे मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक श्री ए एस राजीव यांनी आनंद व्यक्त केला.

एकाच दिवशी या सहा नवीन शाखा सुरु करून एक नवीन ध्येय साध्य केल्याबद्दल बँकेचे कार्यकारी संचालक श्री हेमंत टम्टा यांनी कोलकाता विभागातील बँक कर्मचारी व अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. नवीन शाखा सुरु झाल्यामुळे बँक रिटेल, लघु सूक्ष्म व मध्यम उद्योग , शेती क्षेत्राला वित्त पुरवठ्यात वाढ करून व्यवसायाची नवीन शिखरे गाठेल असा विश्वास बँकेचे कार्यकारी संचालक श्री हेमंत टम्टा यांनी या प्रसंगी व्यक्त केला.

एकाच दिवशी या सहा नवीन शाखा सुरु होण्याच्या प्रसंगाचा साक्षीदार असणे अतिशय आनंदाची बाब असल्याचे नमूद करून बँकेचे दुसरे कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार यांनी बँक ऑफ महाराष्ट्राच्या वाढीला नवीन पंख लाभतील असा विश्वास व्यक्त केला. एकाच दिवशी या सहा नवीन शाखा सुरु केल्याबद्दल सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करतानाच ह्या सर्व ठिकाणी सर्वोत्तम ग्राहक सेवा देण्याचे आश्वासन कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार यांनी याप्रसंगी दिले. बँकेच्या नाविन्यपूर्ण डिजिटल

बँकिंग सुविधेमुळे बँकेच्या ग्राहकांना बँकिंग सेवा सुविधांचा सर्वोत्तम अनुभव घेता येईल असाही विश्वास कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार यांनी व्यक्त केला. ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देता यावी व त्यांच्यासाठी नाविन्यपूर्ण योजना सादर करता याव्यात म्हणून गुंतवणूक क्षेत्रात नवीन डिजिटल मंच व सेवा देण्याच्या दृष्टीने बँकेचा विचार व काम सुरु असून बँकेची नवीन उत्पादने ग्राहकांच्या सर्व वित्तीय गरजा पूर्ण करतील असाही विश्वास कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार यांनी व्यक्त केला. .

नवीन सुरु केलेली शाखांमधून सर्वोत्तम ग्राहक सेवा देण्यात येईल व ग्राहकांच्या। विविध वित्तीय व बँकिंग सेवा पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू असे आश्वासन कोलकाता विभगाचे विभागीय व्यवस्थापक श्री सुशांत गुप्ता यांनी दिले.